# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 18/04/2020 (शनिवार)
(दुपार)

## दुखापत

1) पो.स्टे. नरखेड :— अंतर्गत 06 कि.मी अंतरावर खैरगाव रोडवरील रेल्वे फाटकाजवळ मौजा येरला पावडे येथे दिनांक 16/04/2020 चे 16.00 वा. ते 16.45 वा. दरम्यान 17 वर्षीय विधीसंर्घषग्रस्त बालक यास फिर्यादी नामे— विक्कीबाबा प्रकाश पाटील, वय 28 वर्ष, रा. येरला पावडे, ता. नरखेड याने 'प्रल्हाद फुसे याला मारहाण का केली' असे विचारणा केली. या कारणावरून विधीसंर्घषग्रस्त बालक, आरोपी क्र. 1) सागर आरघेडे, वय 32 वर्ष व 2) यादव पिकले, वय 29 वर्ष, तिन्ही रा. येरला पावडे यांनी संगनमत करून फिर्यादीस हातबुक्याने तसेच लाकडी काठीने मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दीली

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 324,323,504,506,34, भा.द.वि सहकलम 3 (1) (आर) (एस), 3 (2)(5अ) अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास श्री. नागेश जाधव उपविभागीय पोलीस अधिकारी विभाग काटोल हे करीत आहे.

2) पो.स्टे. जलालखेडा :— अंतर्गत 08 कि.मी अंतरावर रानवाडी येथे दिनांक 16/04/2020 चे 17/00 वा. ते 17.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रदिप ओमप्रकाश खजुरिया वय 35 वर्ष, रा रानवाडी व आरोपी नामे— क्र. 1) जनार्धन खरपुरीया, वय 50 वर्ष व 2) सौ. संगिता जनार्धन खरपुरीया, वय 40 वर्ष दोन्ही रा. रानवाडी हे एकमेकाचे घराशेजारी राहणारे असून फिर्यादी हा आरोपी क. 1 याच्या दुकानात खर्रा मागण्यास गेला असता त्याला आरोपीतांनी 15 रू. दे तेव्हा फिर्यादीने म्हटले कि, माझ्या जवळ पैसे नाही. या कारणाावरून आरोपी क्र. 1 ने फिर्यादीचे जबडयाला काडी मारली त्यामुळे फिर्यादीचे दोन दात पडले व आरोपी क 2 हिने लोखंडी गोटयाने फिर्यादीच्या दोन्ही पायाला मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 324,325,34 भा. द.वि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अनील जोशी 7499760728 हे करीत आहे.

3) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर शनिवारी वार्ड, रामटेक येथे दिनांक 17/4/2020 चे 19:00 वा. ते 19:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– छत्रपाल रमेश लांडगे, वय 33 वर्ष, रा. शनिवारी वार्ड रामटेक याच्या अंगणात आरोपी क्र 1) शिवश्याम समरीन नागपुरे याने थुकले असता फिर्यादीने आरोपीला हटकले. या कारणावरून आरोपी क्र. 1), 2) देवा नागपुरे व 3) समरीन नागपुरे सर्व रा. शनिवारी वार्ड रामटेक यांनी फिर्यादीला हातबुक्कयाने मारहाण करून जखमी केले. आरोपी क्र 1 याने गोटा हातात घेवुन डोक्यावर मारले व तिन्ही आरोपीतांनी मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम 324,325,34 भा.द.वि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा सदाशिव काठे 9011326793 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर